भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.४५०/२०२२
मंदाकिनी  मयत वारस वि. शासन व इतर
CNR-MH0S060006502022

## निशाणी ०८ खालील आदेश

०१. सदरचा अर्ज गैरअर्जदार क्र.१ व २ यांनी हजर होऊन परिच्छेदानुसार म्हणणे न दिल्यामुळे त्यांच्याविरुध्द पारित झालेला 'एकतर्फा आदेश' रद्द करुन त्यांचे म्हणणे दाखल करुन घेणेसाठी दाखल केला आहे. त्यांचे म्हणणेनुसार संबंधित विभागाकडून विहित मुदतीमध्ये परिच्छेदानुसार उत्तर प्राप्त न झाल्याने ते मुदतीमध्ये प्रकरणात हजर होऊ शकले नाहीत. सदर अर्जावर अर्जदार यांनी तीव्र हरकत नोंदवली आहे.

०२. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकले. सदरील मुळ अर्ज हा भुसंपादन निर्देशन अर्ज असून नुकसान भरपाईची वाढीव रक्कम मिळणेसाठी दाखल केला आहे. गैरअर्जदार क्र.१ म्हणजेच शासन व गैरअर्जदार क्र.२ त्यांचे अधिकारी आहेत. दोघांचे म्हणणे भुसंपादन अर्जाच्या अंतिम न्यायनिर्णयासाठी आवश्यक आहे. अर्जाच्या हकीकतींचा, त्यावरील अर्जदाराच्या म्हणण्याचा विचार करता गैरअर्जदार क्र.१ व २ यांना आपले म्हणणे सादर करणेसाठी एक संधी देणे योग्य होईल असे मला वाटते. म्हणून न्यायाच्यादृष्टीने मुळ भुसंपादन अर्ज निकाली करण्याच्या उद्देशाने, सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल असे मला वाटते. सबब, गैरअर्जदार क्र.१ व २ यांच्याविरुध्द पारित करण्यात आलेला 'अभिगृहीत एकतर्फा आदेश' रद्द करण्यात येतो.

०३. उभयतापक्षांनी आदेशाची नोंद घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SONIAJYOTI AJIT KANSHIDE
Date: 2023.05.09 19:16:13 +0530

दिनांक ०२.०५.२०२३

( एस.ए.कानशिडे )
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, उमरगा.

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment/order are same, word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of Stenographer : | L.S. Patil |
| Court Name : | Jt. Civil Judge, S.D. Omerga. |
| Date : | 02.05.2023 |
| Order signed by the Presiding Officer on : | 02.05.2023 |
| Order uploaded on : | 09.05.2023 |